

विजेत्या संघासोबत प्रशिक्षक व मार्गदर्शक

# 'खो-खो' स्पर्धेत कमला कॉलेजला विजेतपद

**कोल्हापूर** : छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे झालेल्या शासकीय म.न.पा. जिल्हास्तर खो-खो स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटात कमला कॉलेजने विजेतपद मिळविले. अंतिम सामन्यात कमला कॉलेजने विद्यापीठ ज्युनिअर कॉलेजवर ४-६ असा विजय मिळविला. विजयी संघात योगिता रेवडे (कर्णधार), सीमा अष्टेकर, मेघा सुळेकर, स्वप्नाली मोरे, नीलम काशिद, आरती पोवार, रूपाली तळेकर, तृप्ती मोगणे, पुनम जाधव, स्नेहल नस्तवाडकर, प्रियांका इंदूलकर, अनुराधा पाटील यांचा समावेश आहे. या संघाची निवड रत्नागिरी येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे. संघाला प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. सुनिता काळे व प्रा. साधना पाटील यांचे मार्गदर्शन लाभले..

पुढारी ७३/९/०६

# महाराष्ट्र, कमला कॉलेजला खो-खो स्पर्धेत अजिंक्यपद

कोल्हापूर, ता. ११ : जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने सुरू असलेल्या शहरस्तरीय १९ वर्षाखालील खो-खो स्पर्धेत मुलांत महाराष्ट्र ज्युनिअर कॉलेज, तर मुलींत कमला कॉलेजने अजिंक्यपद मिळविले. छत्रपती शिवाजी स्टेडियममध्ये स्पर्धा झाली.

अंतिम सामन्यात मुलांत महाराष्ट्रने विद्यापीठ ज्युनिअर कॉलेजला १३-०६ गुण फरकाने नमविले. तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यात विद्यापीठने १०-०७, तर महाराष्ट्रने माधवराव बागल ज्युनिअर कॉलेजला १५-०१ पराभूत केले.

मुलींच्या अंतिम सामन्यातील चुरशीच्या लढतीत कमलाने विद्यापीठ ज्युनिअर कॉलेजवर ४-३ गुण फरकाने विजय मिळविला. उपांत्य सामन्यात विद्यापीठने महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूलचा ६-४ गुण फरकाने पराभव केला.

क्रीडा